# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन, छपत्रपती शिवाजी महाराज मार्ग, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)
ता.जि.ठाणे-401 101

**संगणक विभाग**

जा.क्र.मनपा/संगणक/ ८० /२०२१-२२ दि. 08/01/2022

प्रति,
**श्री. मोहन नाडर,**
**त्र्यंबकेश्वर अपार्टमेंट, खो. नं. ४०२,**
**संकटमोचन हनुमान मंदिरासमोर,**
**लोकमान्य नगर नं. १,**
**ठाणे - ४०० ६०६**

**विषय :-** केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये मागील एका वर्षापासून आजपावेतो माहितीच्या अधिकाराखाली केल्या गेलेल्या एकूण माहितीचे अर्ज व तक्रारी बाबतची माहिती तसेच केलेली कार्यवाही.

**संदर्भ :-** जा.क्र.मनपा/सा.प्र./५९५/२०२१-२२ दि. ३१/१२/२०२१ रोजीचे जनमाहिती अधिकारी तथा सहा. आयुक्त (सा.प्र.) यांचे दि. ३१/१२/२०२१ रोजीचे पत्र.

महोदय,

उपरोक्त सदर्भित विषयान्वये केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये आपणांस माहिती मिळणेकामी जनमाहिती अधिकारी तथा सहा. आयुक्त (सा. प्र.) यांचे दि. ३१/१२/२०२१ रोजी प्रत्र प्राप्त झालेले आहे.

त्याअनुषंगाने आपणांस अपेक्षित असलेली माहिती खालील नमुन्यात देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | उत्तरे |
|---|---|---|
| 1 | मिरा भायंदर येथील माहिती अधिकारी सक्रिय कार्यकर्ते हे सामान्य जनतेस त्रास देण्याच्या हेतूने तसेच माहितीच्या अधिकाराचा दुरूपयोग करून माहितीच्या अधिकाराचे अर्ज व तक्रारीबाबत. अश्याप्रकारे मागील एका वर्षापासून आजपावेतो माहितीच्या अधिकाराखाली केल्या गेलेल्या एकूण माहितीचे अर्ज व तक्रारी बाबतची माहिती व त्याची नावासहीत यादी तसेच, ज्या उद्देशाने करण्यात आलेले माहितीच्या अधिकाराचे अर्ज व तक्रारी बाबतची संपूर्ण लेखी माहिती विनाविलंब देण्यात यावी. माहितीच्या अधिकाराखाली केले गेलेल्या एकुण माहितीचे अर्ज व तक्रारी वरून आपणाकडून देण्यात आलेल्या माहिती | सदरची माहिती मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदरची माहिती आपण संकेतस्थळावरून विनामूल्य प्राप्त करू शकता.<br>संकेतस्थळाचे नाव - mbmc.gov.in व मेनू - सेवा - माहिती अधिकार अधिनियम - संगणक विभाग यादवारे आपणांस माहिती मिळेल.<br>एकूण पृष्ठ ९६ च्या आपणांस साक्षांकित प्रति पाहिजे असल्यास<br>९६ x २ = रू. १९२ मनपा फंडात जमा |

| | | |
|---|---|---|
| | अथवा उत्तराची सविस्तर माहिती देण्यात यावी. | करावे. |

मुद्दा क्र. १ ची माहिती संबंधात एकूण १२५ पानांचे अभिलेखे उपलब्ध आहे. आपण ९६ X रु. २ (दर) = १९२ (अक्षरी - दोनशे पन्नास रुपये मात्र) महानगरपालिका फंडात जमा करावे जेणे करुन आपणांस अपेक्षित असलेली माहिती देता येईल. तसेच आपल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने आपणांस निश्चित माहिती उपलब्ध होणे कामी कार्यालयीन दिवशी कार्यालयीन वेळेत संगणक विभागात अभिलेखाची पाहणी करुन आपण अपेक्षित कागदपत्रांची टिप्पन करुन / यादी करुन दिल्यास प्रति पान रु. २/- प्रमाणे शुल्क आकारुन सदरची माहिती / कागदपत्रे आपणांस उपलब्ध करुन देण्यात येतील.

**तद्नंतरही आपले समाधान न झाल्यास आपण प्रथम अपिलीय अधिकारी मा. उपायुक्त (संगणक) चौथा मजला, मुख्य कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेकडे प्रथम अपील दाखल करु शकता.**

**कळावे.**

**(राजकुमार एम. घरत)**
**सिस्टीम मॅनेजर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रत माहितीस्तव :-**
**जनमाहिती अधिकारी तथा**
**सहा. आयुक्त (सा.प्र.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

C:\Users\Dell\Desktop\मोहन नाडर rti.doc

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
ता. जि. ठाणे - ४०१ १०१, दुरध्वनी क्र. : २८१९ २८२८.

## ।। सामान्य प्रशासन विभागं।।

जा.क्र.मनपा/सा.प्र./५९५ /२०२१ - २२ दि. ३१ /१२ /२०२१

संगणक विभाग
आवक क्र: ४८
दिनांक : ०४/०१/२०२१

प्रति,
सर्व विभाग प्रमुख/ खाते प्रमुख तथा जनमाहिती अधिकारी /
सहा. आयुक्त तथा प्रभाग अधिकारी
प्रभाग क्र.1 ते 6 तथा जनमाहिती अधिकारी,
मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय :- केंद्र शासनाचा माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत माहीती देणेबाबत.

संदर्भ :- श्री. मोहन नाडर यांच्याकडील दि.30/12/2021 रोजीचा अर्ज.

महोदय,

विषयंकित प्रकरणी संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, संदर्भिय पत्रातील विषय हा आपल्या विभागाशी संबंधित असल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम, 2005 मधील कलम 6 (3) अन्वये संदर्भिय पत्र पुढील कार्यवाहीसाठी आपल्या विभागास वर्ग करण्यात येत आहे. संबंधितांस परस्पर माहीती देण्यात यावी अगर सदर विषय हा आपल्या विभागाशी संबंधीत नसेल तर संबंधीत विभागास वर्ग करण्यात यावे, तसेच त्यांची एक प्रत सामान्य प्रशासन विभागांकडे देण्यात यावी.

सोबत :- संदर्भिय पत्र जोडले आहे.

(सुनिल यादव)
सहा. आयुक्त (सा.प्र.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत माहितीस्तव :-

श्री. मोहन नाडर
खो. नं.402, त्र्यंबकेश्वर अपार्टमेंट
संकटमोचन हनुमान मंदिरासमोर,
लोकमान्य नगर नं. 1
ठाणे-400 606

सुनिता पाटील
सुमा चव्हाण
०४/०१/२२

मिरा भाईंदर महानगरपालिका
कार्यालय, भाईंदर (प.)
२४२
३०।१२।२०२१

जोडपत्र अ
पहा नियम (३)
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये, अर्ज

प्रति,
मा. आयुक्त (मु.) तथा जन शासकिय माहिती अधिकारी,
मिरा भाईंदर, महानगरपालिका, इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भायंदर (प), मिरा भायंदर – ४०११०१

१. अर्जदाराचे संपूर्ण नांव : श्री. मोहन नाडर

२. पत्ता : त्र्यंबकेश्वर अपार्टमेंट, खो नं. ४०२, संकटमोचन हनुमान मंदिरासमोर, लोकमान्य नगर नं. १,ठाणे – ४००६०६

३. आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील
(एक) माहितीचा विषय : मिरा भायंदर येथील माहिती अधिकारी सक्रिय कार्यकर्ते हे सामान्य जनतेस त्रास देण्याच्या हेतूने तसेच माहितीच्या अधिकाराचा दुरूपयोग करून माहितीच्या अधिकाराचे अर्ज व तक्रारीबाबत. अश्याप्रकारे मागील एका वर्षापासून आजपावेतो माहितीच्या अधिकाराखाली केल्या गेलेल्या एकुण माहितीचे अर्ज व तक्रारी बाबतची माहिती व त्याची नावासहीत यादी तसेच, ज्या उद्देशाने करण्यात आलेले माहितच्या अधिकाराचे अर्ज व तक्रारी बाबतची संपूर्ण लेखी माहिती विनाविलंब देण्यात यावी. माहितीच्या अधिकाराखाली केले गेलेल्या एकुण माहितीचे अर्ज व तक्रारी वरून आपणाकडुन देण्यात आलेल्या माहिती अथवा उत्तराची सविस्तर माहिती देण्यात यावी.



(दोन) माहितीशी संबंधित कालावधी :

(तीन) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन :

(चार) माहिती टपालाद्वारे किंवा व्यक्तीशः आवश्यक आहे किंवा कसे (प्रत्यक्ष टपाल खर्च अतिरिक्त शुल्कामध्ये समाविष्ट केला जाईल.) : टपालद्वारे

(पाच) टपालाद्वारे असेल त्याबाबतीत (सर्वसाधारण, नोंदणीकृत किंवा शीघ्र) लिफाफयात व स्पिड पोस्ट द्वारे : शीघ्र अपेक्षीत टपालाद्वारे शिघ्रतेने विहित मुदतीत उपलब्ध करून देण्यात यावी माहिती सकारात्मक असावी दिशाभुल करणारी नसावी.

४. अर्जदार दारिद्रय रेषेखालील व्यक्ती आहे काय? (असल्यास, सोबत पुराव्याची छायांकित प्रत जोडवी) : नाही

दिनांक २९/१२/२०२१ ... Nadar